# मुत्युपत्र नोंदणी

# Registration of Will

एखादया व्यक्तीने त्याच्या स्वकष्टार्जित स्थावर वा जंगम मिळकती वा एकत्र कुटंबाच्या वडिलोपार्जित मिळकतीतील त्याचा अविभक्त हिस्सा त्याचे मृत्युनंतर कोणास मिळावा / कोणास देण्यात यावा किंवा त्या मिळकतीची विल्हेवाट कशा रितीने लावण्यात यावी यासाठी तयार केलेला लेख म्हणजे मृत्युपत्र असे सर्वसाधारण म्हणता येईल. मृत्युपत्राला इच्छापत्र (Will) असेही म्हटले जाते.

मुत्युपत्र हा दस्त नोंदणी करीता वैकल्पीक असून, तो कधीही व कोठेही नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात सादर करता येतो. मृत्युपत्र नोंदणी केल्याने मृत्युपत्रकर्त्याचे मुत्युनंतर त्याच्या कायदेशीर वारसांमध्ये मिळकतीबाबत वाद होण्याची शक्यता कमी होते. तसेच मिळकतीची व्यवस्था सुकर रितीने होण्यास मदत होते.

अधिक माहीतीसाठी पहा याच संकेतस्थळावरील सारथी > FAQ> >दस्त नोंदणी >मृत्युपत्र